


सायं दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ५५ वा | मंगळवार दि. १५ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ‘सगळे नाही, एकटाच मुंबईला येतोय’

## देव-देवतांच्या आडून फडणवीसांनी डाव टाकला-मनोज जरांगे

अंतरवली सराटी (कटूसत्य वृत्त):- सध्या मराठा आरक्षण अंमलबजावणीच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी मागील काही दिवसांपासून अंतरवाली सराटीत उपोषण सुरू केलेलं आहे. मात्र, त्यांच्या मागण्यांबाबत राज्य सरकारने अद्याप कोणताही ठोस तोडगा काढलेला नाही.

त्यामुळे आता मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण अंमलबजावणीच्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याची घोषणा केलेली आहे.

मनोज जरांगे यांनी आपल्या आंदोलनाची दिशा स्पष्ट करत मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा करत मराठा समाजाला मोठ्या संख्येनी मुंबईला येण्याचं आवाहन आधी केलं होतं. मात्र, आता मनोज जरांगे यांनी आज (१४ सप्टेंबर) पत्रकार परिषदेत बोलताना आणखी एक मोठी घोषणा केली आहे. ङ्गसगळे नाही, तर मी एकटाच मुंबईला येतोय, आता सरकार कशी परवानगी देत नाहीत तेच बघतो, असं म्हणत मनोज जरांगे यांनी सरकारला मोठा इशारा दिला आहे.

मनोज जरांगे काय म्हणाले?

आज झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, आता मला खिंड लढू द्या. आता मी एकटा लढतो. जेव्हा रस्त्यावरील काटे संपतील तेव्हा मी तुम्हाला (मराठा समाजाला) सांगतो, केव्हा मुंबईला यायचं. आता यामागचं कारण सांगतो. पहिला मुद्दा म्हणजे उद्या (१५ सप्टेंबर) मी एकटाच मुंबईला निघणार आहे. याचा अर्थ असा नाही की तुम्ही येऊ नका. पण तुम्ही ज्या गाड्या लावल्या आहेत, वर्गणी करून तुम्ही जे वाहनं लावलेले आहेत, ते सध्या जशाच्या तसंच ठेवा, त्या वर्गणीमधील पैसे देखील खर्च करू नका, असं आवाहन मनोज



जरांगे यांनी मराठा समाजाला केलं आहे.

तुम्ही आणि मी आपल्या दोघांना आता एकमेकांचं ऐकावं लागणार आहे, तेव्हाच या आंदोलनाचा रथ पुढे चालणार आहे. आता डावपेचानेच हा रथ पुढे जाणार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सण-उत्सवांच्या आडून डाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. आता आपण देखील तशास तसाच डाव टाकणार आहोत. सगळे मराठे मुंबईला गेले तरी आरक्षणच मागायचं आहे आणि मी एकटा गेलो तरी आरक्षणच मागायचं आहे. त्यामुळे सर्व मराठ्यांना योग्यवेळी मुंबईला बोलावलं जाईलङ्ग, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

पोलिसांनी आंदोलनाला परवानगी का नाकारली?

मनोज जरांगे अंतरवाली सराटीतून १५ सप्टेंबर रोजी मुंबईकडे निघणार असून १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. मात्र, मुंबई पोलिसांनी त्यांच्या या उपोषणाला परवानगी नाकारली आहे.

निर्णय फक्त तुम्ही येण्याचा बदलला

‘देव-देवतांच्या आडून फडणवीसांनी डाव टाकला आहे, त्यामुळे डाव पलटतो. मी एकटा लढतो. मुंबईत मराठा समाजाला योग्य वेळी बोलावलं जाईल. तुम्ही तुमच्या गावात सावध आणि सुरक्षित राहा. मराठा समाजाने आता नाराज होऊ नये. वेळप्रसंगी निर्णय बदलावे लागतात. निर्णय फक्त तुम्ही येण्याचा बदलला आहे,‘ असं जरांगे समर्थकांना उद्देशून म्हणाले.

सरकार आणि न्यायदेवतेचा सन्मान होणार की नाही?

‘फडणवीस यांना डाव टाकून मराठ्यांना जिंकवावं लागेल, सण उत्सव आहेत. सगळं सैन्य कधीच एका दिवशी गेलेलं नाही. काही घात झाला तर? मी एकटा मुंबईत जातो. मला कोण अडवतो कोण परवानगी नाकारतो ते बघतो. मराठ्यांची तिथे गर्दी होणार म्हणून तुम्ही परवानगी नाकारली ना? आता मी एकटा येतो. आता आम्ही सरकार आणि न्यायदेवतेचा सन्मान होणार की नाही?‘ असा प्रतिप्रश्न जरांगेंनी प्रशासनाला केला आहे.

मुख्यमंत्री काय म्हणाले?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रसारमाध्यमांशी बोलताना जरांगेंच्या जवळजवळ सर्व मागण्या पूर्ण केल्याचा उल्लेख केला. ‘जरांगेंच्या जवळ जवळ सगळ्या मागण्या पूर्ण झाल्या आहेत. काही मागण्या कोर्टात आहेत. सर्व कोर्टातील मागण्या विविध टप्प्यात आहेत. या मागण्यांसाठी कोर्ट किंवा इतर पद्धती आहेत त्यामुळे तसे करता येईल. आम्ही सगळी चर्चा केली असून संवैधानिक पद्धतीने चर्चा करत आहोत. यापुढेही करूया पण ज्या मागण्या कोर्टात आहेत त्यात आम्ही काही करू शकत नाही. गणेशोत्सव सुरू असताना आंदोलन करणे सोयीस्कर ठरणार नाही,‘ असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**१५ सप्टेंबर : पहिला मुक्काम पाटोदा (जि.बीड).**

**१६ सप्टेंबर : दुसरा मुक्काम श्रीगोंदा (जि.अहिल्यानगर).**

**१७ सप्टेंबर : तिसरा मुक्काम हडपसर (पुणे).**

**१८ सप्टेंबर : चौथा मुक्काम खोपोली (रायगड).**

**१९ सप्टेंबर :मुंबईच्या आझाद मैदानात दाखल होतील.**

## ओम गर्जना युवाशक्ती सामाजिक मंडळातर्फे विविध कार्यक्रम

### किर्तन, पुरस्कार वितरण, महाप्रसादासह महिलांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- विजापूर रोडवरील ओम गर्जना युवाशक्ती सामाजिक व सांस्कृतिक तरुण मंडळातर्फे यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टी अध्यक्ष शाम धुरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गणेशमूर्तीची स्थापना सोमवार, १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता विकास तांबके यांच्या हस्ते होणार आहे. १५ सप्टेंबर




रोजी महिलांसाठी व मुलींसाठी खुली संगीत खुर्ची स्पर्धा, १६ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. प्रकाश साठे महाराज यांचा कीर्तनाचा कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता होईल.१७ सप्टेंबर रोजी सफारी कोण जिंकणार-फनी गेम तसेच मुलांसाठी संगीत खुर्ची स्पर्धा होणार आहे. १८ सप्टेंबर रोजी अथर्वशीर्ष पठण तर १९ सप्टेंबर रोजी महिलांसाठी विविध गुणदर्शनासह रांगोळी स्पर्धेचे आयोजित केली आहे.रविवार, २० सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १२.३० या वेळेत आरोग्य निदान शिबिर होणार आहे. याच दिवशी सायंकाळी ६ वाजता प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. शिवलीला पाटील यांचे कीर्तन होणार आहे.

२१ सप्टेंबर रोजी सायंकाळी प्रसिद्ध कवी डॉ. स्वप्नील चौधरी यांच्या उपस्थितीत ‘जगणे सुंदर आहे’ या विषयावर व्याख्यान होईल. सायंकाळी ६ वाजता पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे. पत्रकार रत्न पुरस्काराने प्रशांत जोशी, उद्योग रत्न पुरस्काराने अतुल चंडक, आरोग्य रत्न पुरस्काराने डॉ. निलरोहित पैके, सामाजिक रत्न पुरस्काराने जुबेर सय्यद (रोटी बँक) आणि शिक्षक रत्न पुरस्काराने डॉ. शहाजी ठोंबरे यांचा गौरव करण्यात येणार आहे.

२२ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध समाज प्रबोधनकार इंजि. पवन महाराज दवंडे-चंद्रपूर यांचे प्रबोधनपर व्याख्यान सायंकाळी ६ वाजता होईल. २३ सप्टेंबर रोजी महाप्रसाद व ऑर्केस्ट्रा हौशी कलाकारांचा कार्यक्रम,२४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता सत्यनारायण महापूजा, तर सायंकाळी ७ वाजता राजलक्ष्मी ज्वेलर्सचे शुभम मंजरतकर यांच्या सहकार्याने होम मिनिस्टर कार्यक्रम होणार आहे. २५ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता महाआरतीनंतर श्रींच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेस अंबादास पांढरे, शावराप्पा वाघमारे, बसवराज भरमगोंडे, सिद्धया हिरेमठ, रेवणसिद्ध बिज्जरगी आदी उपस्थित होते.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- पावसातील खंड आणि कमी पावसामुळे जिल्ह्यातील काही भागांत निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य परिस्थितीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी सोलापूर जिल्हा प्रशासन थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी ४ सप्टेंबर रोजीच जिल्ह्यातील सर्व प्रांताधिकारी व तहसीलदारांना शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन पिकांची, पाण्याची व चारा उपलब्धतेची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांकडून दुष्काळ परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी व धोत्री तसेच अक्कलकोट तालुक्यातील वळसंग, कोण्हाळी, कुरनूर, कुरनूर धरण परिसर, नाविंदगी या गावांना भेट देऊन दुष्काळसदृश्य परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून पिकांची सद्यस्थिती, पावसाचा खंड,



जमिनीतील ओलावा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच जनावरांसाठी चारा याबाबत सविस्तर माहिती घेतली.

शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन, ऊस, व मका या पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी पिकांची पेरणी कधी करण्यात आली, पाऊस शेवटचा कधी झाला, त्यानंतर किती दिवसांचा पावसाचा खंड आहे आणि जमिनीमध्ये सध्या किती ओलावा आहे, याची माहिती शेतकऱ्यांकडून घेतली. पिकांबरोबरच गावातील पिण्याच्या पाण्याची स्थिती आणि जनावरांसाठी उपलब्ध असलेल्या चारा-पाण्याचीही त्यांनी माहिती घेतली. तसेच महसूल व कृषी विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी वस्तुनिष्ठपणे दुष्काळ पाहणी करून त्वरित अहवाल सादर करण्याबाबत निर्देशित केले. जेणेकरून शेतकऱ्यांना शासनाकडून लवकरात लवकर मदत मिळेल.

जिल्ह्यातील ११ तालुक्यांची दोन दिवसांत पाहणी

दुष्काळ परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांची पथके प्रत्यक्ष क्षेत्रात उतरविली आहेत. जिल्हाधिकारी यांनी आज दक्षिण सोलापूर, अक्कलकोट आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील गावांमध्ये दुष्काळाची पाहणी केली. तर अपर जिल्हाधिकारी चार तालुक्यांची १३ सप्टेंबर रोजी, तर निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सांगोला व माळशिरस तालुक्यातील गावांची पाहणी केली. अशा प्रकारे १२ व १३ सप्टेंबर या दोन दिवसांत जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांतील

(पान २ वर)

## सोलापूर भाजपमध्ये जुन्या नेतृत्वाची अस्वस्थता

### सुभाष देशमुखांच्या वक्तव्याने अंतर्गत समीकरणे चर्चेत!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूरच्या राजकारणात भाजपची ताकद वाढविणाऱ्या जुन्या पिढीतील नेतृत्व आणि पक्षात वेगाने पुढे येणाऱ्या नव्या नेतृत्वामधील संघर्ष आता अधिक स्पष्टपणे समोर येण्याची चिन्हे आहेत.

माजी मंत्री तथा दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी अलीकडेच केलेल्या वक्तव्यामुळे या अंतर्गत संघर्षाला पुन्हा तोंड फुटले आहे. विरोधकांशी राजकीय लढा देताना ज्या प्रकारचे सहकार्य आणि राजकीय सौजन्य अनुभवले, तेच आपल्या पक्षातील काही नेत्यांकडून मिळत नसल्याची खंत त्यांनी जाहीरपणे व्यक्त केली. त्यामुळे त्यांच्या नाराजीमागे केवळ वैयक्तिक मतभेद आहेत की भाजपमधील बदलत्या नेतृत्व-समीकरणांची ही प्रतिक्रिया आहे, याची चर्चा सुरू झाली आहे.




सोलापूरमध्ये भाजपची राजकीय पायाभरणी करण्यामध्ये सुभाष देशमुख यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या काळात त्यांनी पक्षाचा विस्तार केला, निवडणुका लढवल्या आणि संघटनात्मक पातळीवर नेतृत्व उभे केले. विधान परिषद, लोकसभा आणि विधानसभा अशा विविध पातळ्यांवर त्यांनी राजकीय ताकद सिद्ध केली. मात्र, गेल्या काही वर्षांत सोलापूर भाजपमध्ये नव्या



नेतृत्वाची स्वतंत्र ताकद निर्माण होत गेली. देवेंद्र कोठे, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे यांसारख्या नेत्यांचा वाढता प्रभाव आणि संघटनेतील बदलती रचना यामुळे पूर्वीच्या नेतृत्वाची राजकीय मध्यवर्ती भूमिका हळूहळू कमी होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सोलापूरच्या प्रशासकीय आणि राजकीय प्रक्रियेतील वाढता सहभाग हा देखील महत्त्वाचा मुद्दा ठरतो. स्थानिक ज्येष्ठ नेतृत्वाला विश्वासात न घेता निर्णय घेतले जात असल्याची भावना निर्माण झाली, तर त्यातून नाराजी वाढणे स्वाभाविक आहे. देशमुख यांनी काही बैठका आणि कार्यक्रमांपासून अंतर ठेवणे, तसेच अन्य पक्षांच्या मंत्र्यांच्या भेटीगाठी घेणे, या राजकीय हालचाली केवळ औपचारिक घटना मानता येणार नाहीत. त्या माध्यमातून स्थानिक नेतृत्व आपली स्वतंत्र राजकीय ताकद अद्याप कायम असल्याचा संदेश देत आहे, असे या घडामोडींकडे पाहता येते.

महापालिकेच्या राजकारणाने या संघर्षाला आणखी एक परिमाण दिले.. सोलापूर महापालिकेतील सत्तासमीकरणात देवेंद्र कोठे यांच्या गटाची वाढलेली ताकद आणि देशमुख गटाशी निर्माण झालेली स्पर्धा यामुळे भाजपच्या अंतर्गत गटांचे राजकारण अधिक ठळक झाले. महापौरपदाच्या समीकरणापासून स्थानिक संघटनात्मक निर्णयांपर्यंत कोणत्या गटाचे वर्चस्व राहणार, हा प्रश्न यापुढील राजकारणात निर्णायक ठरू शकतो.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीतील समीकरणांनी मात्र देशमुखांच्या नाराजीला वेगळे राजकीय स्वरूप दिले. सुभाष देशमुखांचे पारंपरिक राजकीय प्रतिस्पर्धी राहिलेले दिलीप माने यांच्यासोबत भाजपने केलेली राजकीय जुळवाजुळव आणि त्यानंतर माने यांचा भाजप प्रवेश, हा देशमुखांसाठी केवळ एका नेत्याचा पक्षप्रवेश नसून स्थानिक राजकारणातील पर्यायी नेतृत्व उभे करण्याचा संकेत म्हणून पाहिला गेला. एखाद्या ज्येष्ठ नेत्याच्या प्रभावक्षेत्रात त्याच्याच राजकीय प्रतिस्पर्ध्याला स्थान मिळणे, हा कोणत्याही पक्षातील सत्तासमीकरण बदलण्याचा प्रभावी मार्ग असू शकतो.

मात्र, या सर्व घडामोडींमागे थेट 'सुभाष देशमुखांना संपविण्याचा भाजपचा कट' आहे, असा निष्कर्ष काढणे राजकीयदृष्ट्या घाईचे ठरेल. भाजपसारख्या विस्तारलेल्या पक्षात स्थानिक नेतृत्वांची संख्या वाढविणे, एकाच नेत्यावर अवलंबित्व कमी करणे आणि पुढील पिढीतील नेतृत्वाला संधी देणे ही संघटनात्मक

(पान २ वर)

## पारंपरिक वाद्यांचा गजर, लेझीम

### सोलापूरात विघ्नहर्त्याचे जल्लोषात स्वागत

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’चा गगनभेदी जयघोष, ताशा-संबळ या पारंपरिक वाद्यांचा गजर आणि लेझीम तालावर थिरकणारी पावले अशा अत्यंत उत्साही वातावरणात सोमवारी (दि.१४) सोलापूर शहर व परिसरात लाडक्या बाप्पाचे वाजतगाजत स्वागत करण्यात आले. यंदाचा गणेशोत्सव तब्बल १२ दिवसांचा असल्याने भाविकांमध्ये आनंदाचे उधाण आले आहे. शहरात पोलीस प्रशासनाची परवानगी घेतलेल्या ९७४ सार्वजनिक मंडळांसह हजारो घरांमध्ये विघ्नहर्त्याची विधिवत प्रतिष्ठापना झाली. तर दुसरीकडे, सोलापूर ग्रामीण भागातही गणेशोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह असून ३ हजार २४६ सार्वजनिक मंडळांत बाप्पा विराजमान झाले आहेत.

बाजारपेठांमध्ये कोट्यवधींची उलाढाल; मूर्तींच्या दरात २० टक्के वाढ:

बाप्पाच्या आगमनानिमित्त टिळक चौक, मधला मारुती, कन्ना चौक, बाळीवेस आणि नवी पेठ परिसरातील मध्यवर्ती बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. पूजेचे साहित्य, मखर, रोषणाई आणि फुलांच्या खरेदीला मोठा वेग आला.

यंदा कच्च्या मालाच्या दरवाढीमुळे घरगुती व सार्वजनिक मूर्तींच्या दरात सरासरी २० टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. नागरिकांनी लालबागचा राजा, दगडूशेठ अशा विविध आकर्षक रूपांतील मूर्तींना विशेष पसंती

(पान २ वर)

# संपादकीय

## बालविवाहमुक्तीसाठी गावपातळीवरची लढाई

बालविवाहाच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधणारा एक महत्त्वाचा निर्णय नुकताच संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने घेतला. चार सप्टेंबर २०२६ रोजी संयुक्त राष्ट्रांनी २७ नोव्हेंबर हा 'बाल, लवकर आणि सक्तीच्या विवाह निर्मूलनाचा आंतरराष्ट्रीय दिवस' म्हणून घोषित करणारा ठराव एकमताने मंजूर केला. भारतानेही या ठरावाला पाठिंबा दिला आहे. हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, बालविवाह थांबवण्याची खरी लढाई आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नव्हे, तर गावातील कुटुंब, शाळा, ग्रामपंचायत आणि स्थानिक यंत्रणांच्या पातळीवर लढली जाणार आहे. बालविवाह रोखण्यासाठी केवळ एक तारीख पुरेशी नाही; गावागावात सक्षम, जबाबदार आणि सतत कार्यरत असलेली यंत्रणा उभी राहणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या (एनएफएचएस-६) ताज्या आकडेवारीनुसार, भारतात २० ते २४ वर्षे वयोगटातील २०.१ टक्के महिलांचे लग्न १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झाले होते. महाराष्ट्रात हे प्रमाण १९.७ टक्के आहे. एनएफएचएस-५ मध्ये महाराष्ट्राचे प्रमाण २१.९ टक्के होते. म्हणजे काही प्रमाणात सुधारणा झाली असली, तरी प्रश्न संपलेला नाही. उलट, जिल्हानिहाय स्थिती पाहिली तर अनेक भागांत हा प्रश्न अजूनही गंभीर स्वरूपात कायम असल्याचे स्पष्ट होते.

महाराष्ट्राचा जिल्हानिहाय नकाशा पाहिला तर चित्र अधिक अस्वस्थ करणारे आहे. एनएफएचएस-५नुसार परभणीमध्ये ४८ टक्के, बीडमध्ये ४३.७ टक्के, धुळ्यात ४०.५ टक्के, सोलापूरमध्ये ४०.३ टक्के, हिंगोलीत ३७.१ टक्के, धाराशिवमध्ये ३६.६ टक्के, जालन्यात ३५ टक्के आणि नांदेडमध्ये ३२.२ टक्के महिलांचे लग्न १८ वर्षांपूर्वी झाले होते. म्हणजेच राज्याच्या सरासरीपेक्षा काही जिल्ह्यांमध्ये परिस्थिती कितीतरी गंभीर आहे. त्यामुळे राज्यस्तरीय घोषणा पुरेशी नाही; प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक संदर्भ समजून कृती करावी लागेल.

या आकडेवारीकडे केवळ 'बालविवाहाचे प्रमाण' म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक टक्केवारीमागे एका मुलीचे आयुष्य आहेङ्ग तिचे शिक्षण, आरोग्य, स्वावलंबन आणि स्वतःच्या आयुष्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे. बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण खंडित होते, आरोग्यावरील जोखीम वाढते, लवकर मातृत्वाचा दबाव येतो आणि आर्थिक स्वावलंबनाचे मार्ग बंद होतात. त्यामुळे हा केवळ कायद्याचा किंवा परंपरेचा प्रश्न नसून, तो मुलींच्या संपूर्ण विकासाशी संबंधित प्रश्न आहे. जालन्यात युनिसेफसोबत काम करताना ग्रामपंचायत आधारित नियोजनाच्या माध्यमातून ७७८ गावांमध्ये बालहक्क, बालसंरक्षण, शिक्षणातील गळती आणि बालविवाहासारख्या प्रश्नांवर स्थानिक पातळीवर माहिती गोळा करून ती नियोजनाशी जोडण्याचा प्रयत्न झाला. ४,२०० हून अधिक किशोरवयीन मुला-मुलींशी आणि युवकांशी काम करताना त्यांच्या प्रश्नांना ग्रामपंचायत आणि जिल्हा प्रशासनाच्या नियोजनाशी जोडण्याचे काम झाले. या प्रक्रियेत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवलीङ्गगावात माहिती असते, पण ती व्यवस्थेपर्यंत वेळेवर पोहोचत नाही. ही दरी भरून काढणे अत्यंत आवश्यक आहे.

या प्रक्रियेत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आलाङ्गबालविवाह रोखण्यासाठी स्थानिक पातळीवर जबाबदारी निश्चित करणे. महाराष्ट्र शासनाने बालविवाह प्रतिबंधक कायदा , २००६ मधील कलम १६ अंतर्गत ग्रामसेवकांची त्यांच्या संबंधित ग्रामपंचायतीच्या क्षेत्रासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. संबंधित ग्रामपंचायतीतील अंगणवाडी सेविकांनी या अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, अशीही तरतूद करण्यात आली. ही तरतूद कागदावर राहू नये. जालन्यात युनिसेफसोबत काम करताना ग्रामपंचायतस्तरावरील यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आणि बालसंरक्षणाची स्थानिक व्यवस्था मजबूत करण्यासाठी काम करता आले. त्याच काळात एकात्मिक बालसंरक्षण योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ग्राम बाल सुरक्षा समितीसारख्या स्थानिक बालसंरक्षण यंत्रणांना सक्रिय करण्यावर भर देण्यात आला. हा अनुभव आजही महत्त्वाचा वाटतो. कारण बालविवाह हा शेवटच्या क्षणी पोलिस किंवा प्रशासनाने हस्तक्षेप करण्याचा विषय नाही. तो आधी ओळखण्याचा, समुपदेशन करण्याचा, कुटुंबाला आधार देण्याचा आणि मुलीसमोर शिक्षण व सुरक्षिततेचे पर्याय उभे करण्याचा विषय आहे. केवळ विवाह थांबवणे पुरेसे नाही; त्या मुलीचे पुढील शिक्षण, सुरक्षितता आणि आत्मविश्वास टिकवणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

मग प्रश्न असा आहे की, कायदा, योजना आणि अभियान असूनही बालविवाह का टिकतो? गरिबी हा एक महत्त्वाचा घटक आहे; पण तो एकमेव कारण नाही. मुलीचे शाळेतून गळणे, माध्यमिक शिक्षणाची मर्यादित उपलब्धता, सुरक्षिततेबाबत पालकांची चिंता, सामाजिक दबाव, स्थलांतर, कुटुंबाची आर्थिक असुरक्षितता आणि 'मुलीचे लग्न लवकर केले तर जबाबदारी संपते' ही मानसिकताङ्गहे सर्व घटक परस्परांशी जोडलेले आहेत.

यूएनएफपीए सोबत महाराष्ट्रात काम करताना ४,००० हून अधिक किशोरवयीन मुलींच्या शिक्षण, कौशल्य आणि सक्षमीकरणाशी संबंधित उपक्रमांमधूनही एक गोष्ट स्पष्ट झालीङ्गमुलीसमोर शिक्षण, कौशल्य, रोजगार आणि सुरक्षिततेचे पर्याय उभे राहिले, तर बालविवाहाविरोधातील तिची आणि कुटुंबाची भूमिका अधिक मजबूत होते. मुलीला शिष्यवृत्ती, सायकल, वसतिगृह, सुरक्षित वाहतूक, डिजिटल शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि स्थानिक रोजगाराच्या संधी मिळाल्या, तर कुटुंबाचे निर्णयही बदलू लागतात. म्हणूनच आता महाराष्ट्राच्या प्रादेशिक विविधतेनुसार जिल्हानिहाय आणि गावनिहाय कृती आराखडे आवश्यक आहेत. बीड आणि परभणीतील परिस्थितीची कारणे यवतमाळ किंवा वर्ध्यापेक्षा वेगळी असू शकतात. त्यामुळे उपायही वेगळे असायला हवेत. प्रत्येक उच्च-जोखीम गावासाठी शाळाबाह्य मुलींची यादी, स्थलांतरित कुटुंबांची माहिती, किशोरवयीन मुलींच्या शिक्षणाची स्थिती आणि बालविवाहाच्या संभाव्य घटनांचे स्थानिक नकाशीकरण करणे गरजेचे आहे. ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, आरोग्य विभाग, बालसंरक्षण यंत्रणा, महिला बचत गट, युवक आणि स्वयंसेवी संस्था यांच्यातील समन्वय हा या लढाईचा केंद्रबिंदू असायला हवा. कोणती मुलगी शाळा सोडण्याच्या धोक्यात आहे, कोणत्या कुटुंबावर स्थलांतराचा परिणाम होत आहे, कुठे विवाहाची चर्चा सुरू आहे, ही माहिती वेळेवर उपलब्ध झाली तर प्रशासनाचा हस्तक्षेपही वेळेवर होऊ शकतो. २७ नोव्हेंबर हा केवळ जनजागृतीचा दिवस न राहता जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर प्रगती मोजण्याचा दिवस व्हावा. किती मुली शाळेत टिकल्या? किती बालविवाह रोखले? किती गावांनी बालविवाहविरोधी कृती आराखडा तयार केला? किती मुलींना कौशल्य आणि रोजगाराच्या संधी मिळाल्या? अशा प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत.

# इडा-पिडा,महागाई,भ्रष्टाचारी व घोटाळेबाजांना घेऊन जा गे मारबत!!!

नागपूरातील मारबत उत्सव ही देशाच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे.याच उद्देशाने नागपूरच्या १४६ वर्षांचा मारबत-बडग्या उत्सव आता आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याची तयारी नागपूर महानगरपालिकेने केली आहे.याकरीता मनपाने या उत्सवासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद केली आहे ही ऐतिहासिक दृष्ट्या नागपूरकरांसाठी गौरवाची गोष्ट आहे. मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले.येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४६ वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ,भ्रष्टाचार दूर व्हावा. नागपूरसाठी आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४६वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल.कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात.त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात.असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे.त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते.मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते.मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते माशा-मुरकुट्या,रोगराईला घेऊन जा गे मारबतअशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही. कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून बडगा काढून निषेध केला जातो.त्याच प्रमाणे महागाई,अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.त्याचप्रमाणे यावर्षी पेपर फुटीच्या संदर्भात सुद्धा बडग्या निघेल.यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो.कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी,भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती निर्माण होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर १९२८मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या तरीही संपूर्ण धर्माच्या समाजबंधवांनी मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिली नाही ही नागपूरसाठी व देशासाठी स्वाभिमानाची बाब आहे.त्यामुळे या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही. परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विघ्न निर्माण केले.परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले. मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ,पेट्रोल दरवाढ ,शहरातील खड्डे,पाकिस्तान,चीन, आतंवाद, घोटाळेबाज, भ्रष्टाचारी, अत्याचारी,बेरोजगारी आणि आता पेपर फुटी इत्यादी घटनेच्या विरोधात शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते.मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो.आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील१४५ कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो.देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनी देशाला लुटले खरे,परंतु देशातील भ्रष्ट नेत्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे.यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे.याचे प्रायश्चित्त देशातील १४५ कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!



**रमेश कृष्णराव लांजेवार (स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## * पान १ वरुन *

*** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर.....**

दुष्काळसदृश्य गावांची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. या दोन दिवसांत महसूल प्रशासनासह दुष्काळ परिस्थितीशी संबंधित सर्व विभागांचे अधिकारी त्यांच्या कार्य क्षेत्रात राहून परिस्थितीची माहिती संकलित करणार आहेत. प्रांताधिकारी, तहसीलदार व संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या अहवालांचे संकलन करून दुष्काळ परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनाला तातडीने सादर करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगितले की, शासनाच्या निकषांनुसार कमी पाऊस आणि पावसातील खंड हे दुष्काळ परिस्थितीचे महत्त्वाचे ट्रिगर मानले जातात. सध्या जिल्ह्यातील माळिशरस, सांगोला, मोहोळ आणि बार्शी या चार तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ व ट्रिगर-२ मध्ये येऊ शकतात. त्यामुळे संबंधित तालुक्यांतील परिस्थितीचे बारकाईने मूल्यांकन करण्यात येत आहे.

जिल्ह्यात सध्या ४२ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, आगामी काळात पाऊस न झाल्यास आवश्यकतेनुसार टँकरची संख्या वाढविण्यात येऊ शकते, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. उजनी धरण १०० टक्के भरले; लघु प्रकल्पांत पाणीसाठा- उजनी धरण सध्या १०० टक्के भरलेले आहे. धरण पूर्ण भरल्यानंतर अतिरिक्त पाण्याचा विसर्ग करून जिल्ह्यातील सुमारे ४० टक्के लघु पाणी प्रकल्प भरून घेण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचा योग्य पद्धतीने वापर करण्याबरोबरच भविष्यातील पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी : आमदार सचिन कल्याणशेट्टी

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनीही अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. सध्या जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने पिकांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळ परिस्थितीची तातडीने पाहणी करून त्याचा अहवाल शासनाला पाठवावा आणि शासनाने दुष्काळाच्या निकषांनुसार शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत जाहीर करावी, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीची संपूर्ण पाहणी पूर्ण करून वस्तुनिष्ठ अहवाल शासनाला सादर करण्यात येईल. शासनाच्या निर्णयानुसार पात्र शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील असल्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी यावेळी स्पष्ट केले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रताप नगर व भाटेवाडी येथील शेती पिकाची पाहणी- जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रताप नगर आणि भाटेवाडी येथील शेती पिकाची पाहणी केली. येथील तुर, उडीद, सोयाबीन ऊस, मका आणि कागदी लिंबू या पिकाची पाहणी करून संबंधित शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. येथील पिकांची जून जुलैमध्ये पेरणी झालेली असून त्यानंतर पाऊस न आल्याने पिके पूर्णपणे कोमेजून जळून गेलेली आहेत. तसेच उसाची वाढ झालेली नाही, कागदी लिंबू फुलावर असताना पाऊस न आल्याने फुले लागलेली नाही अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली. तसेच उसासाठी कॅनॉल मधून पाणी सोडण्याची ही मागणी केली तर अनेक शेतकऱ्यांनी उडीद तूर पिके पावसा अभावी काढून टाकलेले आहेत अशा शेतकऱ्यांनाही शासनाची मदत मिळावी अशी मागणी केली.

जिल्हाधिकारी यांनी केला स्वतः डिजिटल क्रॉप सर्व्हे- भाटेवाडी तालुका उत्तर सोलापूर येथील शेतकऱ्यांच्या शेती पिकाची पाहणी करत असताना येथील कागदी लिंबू उत्पन्न घेत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाचा डिजिटल क्रॉप सर्व्हे जिल्हाधिकारी यांनी स्वतः केला. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, प्रांताधिकारी सुमित शिंदे, प्रांत अधिकारी सदाशिव पडदुने, दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे, अक्कलकोट तहसीलदार विनायक नगर, उत्तर चे तहसीलदार निलेश पाटील, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत मंगरूळे, दक्षिणचे तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांच्यासह महसूल, कृषी, ग्रामविकास विभागाचे अधिकारी तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

*** सोलापूर भाजपमध्ये जुन्या नेतृत्वाची.....**

रणनीती असू शकते. त्यामुळे सध्याच्या संघर्षाकडे व्यक्तीविरोधापेक्षा नेतृत्वाच्या संक्रमणाची प्रक्रिया म्हणून पाहणे अधिक योग्य ठरू शकते.

यातच देशमुखांच्या वक्तव्याचा राजकीय अर्थ महत्त्वाचा ठरतो. 'आम्ही शरद पवार सुशीलकुमार शिंदे यांच्या विरोधात एवढी लढलो त्यांनी कधीही विरोधक असूनही त्रास दिला नाही; मात्र आपल्याच लोकांना उपकारांची जाणीव नाही' या आशयाची त्यांची खंत ही केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून पक्षांतर्गत संवादातील दुरावा किती वाढला आहे, याचे संकेत मानले जात आहेत.

ज्येष्ठ नेतृत्वाला सन्मान आणि निर्णयप्रक्रियेत स्थान हवे आहे, तर नव्या नेतृत्वाला स्वतंत्र राजकीय अवकाश हवा आहे. या दोन अपेक्षांमध्ये समन्वय न झाल्यास गटबाजी अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे सुभाष देशमुख एकटेच राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे घटक नाहीत. सोलापूर शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्यासह दोन्ही देशमुखांची स्थानिक राजकीय ताकद आणि कार्यकर्त्यांशी असलेले संबंध भाजपसाठी दुर्लक्षित करता येणार नाहीत. त्यामुळे ज्येष्ठ नेतृत्वाला पूर्णपणे बाजूला करण्याचा कोणताही प्रयत्न उलट पक्षासाठीच संघटनात्मक आव्हान निर्माण करू शकतो. दुसरीकडे, केवळ जुन्या राजकीय प्रभावाच्या आधारावर नव्या नेतृत्वाचा उदय रोखणेही भाजपच्या विस्ताराच्या धोरणाशी विसंगत ठरू शकते.

त्यामुळे सोलापूर भाजपसमोरील खरी कसोटी 'कोणाला संपवायचे' यापेक्षा जुन्या आणि नव्या नेतृत्वामध्ये सत्ता, सन्मान आणि निर्णयाधिकाराचे संतुलन कसे साधायचे, ही आहे. आगामी स्थानिक आणि विधानसभा राजकारणाच्या पार्श्वभूमीवर हे समीकरण अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. देशमुखांची नाराजी पक्षांतर्गत संघर्षात परिवर्तित होते की वरिष्ठ नेतृत्व मध्यस्थी करून हा तणाव कमी करते, यावर सोलापूर भाजपच्या पुढील राजकीय वाटचालीची दिशा मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे.

*** पारंपरिक वाद्यांचा गजर, लेझीम .....**

दिली. ग्रामीण भागात २५८ गावांत 'एक गाव एक गणपती'-जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ग्रामीण कार्यक्षेत्रात एकूण ३ हजार २४६ सार्वजनिक गणेश मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, सामाजिक ऐक्य आणि सलोख्याचे प्रतीक म्हणून ग्रामीण भागातील तब्बल २५८ गावांमध्ये 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

**सिलींग जमीन भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करीता जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे आढेगांव ता. मोहोळ जि.सोलापूर येथील शेतजमीन गट नं.३९२/२ क्षेत्र ०१ हे ९३ आर,पो.ख. क्षेत्र ०० हे ०७ आर, एकुण क्षेत्र ०२ हे ०० आर, आकार ००रु ६० पैसे ही मिळकतीचे खातेदार श्री-हनमंत निवृत्ती सुतार रा.खवणी ता.मोहोळ जि. सोलापूर यांनी सदरची जमीन भोगवटादार वर्ग-२ ची असल्याने सदर जमिनीची भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करीता आमचे अशिल श्री.हनमंत निवृत्ती सुतार यांनी मा. अपर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमुद शेतजमीनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगीहक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्यूपत्र, खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे-घेणे इ. बाबत काही हरकत/तक्रार/ हतसंबंध/अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा. अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचाही हरकत प्राप्त न झालेस कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमीनीचा झालेला खरेदी व्यवहार विधीग्राह्य होणेसाठी पुढील कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.ता.१४/०९/२०२६

**ॲडव्होकेट-ॲड. मनोजकुमार एम- नावडे**
**तांबोळी कॉम्प्लेक्स, यशवंत नगर, मोहोळ.**
**पत्ता- जि. सोलापूर चे. ९५०३९३२३०३**
**अशिल श्री/श्रीम-हनमंत निवृत्ती सुतार**
**पत्ता- खवणी ता. मोहोळ**
**जि. सोलापूर पिन. ४१३२४८**

**CHANGE IN NAME**

I am changing my name from IRANNA TEGYELI To IRANNA HANMANTAPPA TEGGELLI for passport issuance as per document.

# २४ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पत्रकारांच्या घरांचे स्वप्न साकारले

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दोन तपांहून अधिक काळापासून प्रतीक्षेत असलेल्या पत्रकारांच्या हक्काच्या घरांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने शनिवारी महत्त्वाचे पाऊल पडले. पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या (म्हाडा) उपविभाग सोलापूरअंतर्गत सी.एस. क्र. २३२ येथे प्रधानमंत्री आवास योजनेत बांधण्यात आलेल्या २३८ सदनिकांची सोडत मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडली. यामध्ये १२६ अत्यल्प उत्पन्न गट (EWS) आणि ११२ अल्प उत्पन्न गटातील (LIG) सदनिकांचा समावेश आहे.

या कार्यक्रमास राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे, लोकसभेच्या खासदार प्रणिती शिंदे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक मनीष केत, उपमुख्य अधिकारी पुणे मंडळ राहुल शिळीमकर, प्र कार्यकारी अभियंता पुणे मंडळ मिलिंद अटकळे,मिळकत व्यवस्थापक रूपेश जयभाये, सोलापूर उपविभाग सूरज अजनाळकर , सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने, खजिनदार किरण बनसोडे, उपाध्यक्ष आफताब शेख, महाराष्ट्र राज्य पत्रकार अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके



यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार देवेंद्र कोठे यांनी पत्रकार संघटनांनी तब्बल २४ वर्षे केलेल्या पाठपुराव्याचा उल्लेख केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात जागा निश्चित होऊन भूमिपूजन झाल्याचे सांगत, पत्रकारांना घर मिळेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. सोडत प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. तसेच गुढीपाडव्यापूर्वी पत्रकारांच्या हातात घराची चावी देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पत्रकारांच्या आर्थिक परिस्थितीचा उल्लेख करत सदनिकांची किंमत आणखी कमी करण्यासाठी शासन, सीएसआर आणि इतर माध्यमांतून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. पत्रकारांसाठीचा हा प्रकल्प देशातील पहिला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी पत्रकार म्हणून आपल्या कारकिर्दीतील आठवणी सांगत, बाह्य सुविधांसाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याचे सांगितले. या निधीमुळे प्रत्येक सदनिकेची किंमत सुमारे २ ते २.५ लाख रुपयांनी कमी होण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक उपमुख्य अधिकारी पुणे मंडळ राहुल शिळीमकर यांनी केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले. यावेळी म्हाडाचे सोमनाथ रावळे, गोरक्षनाथ कुलट, बालकृष्ण दावनपल्ली , प्रमोद शिंदे , सतीश लष्करे , हरिदास देशमुख , सुमित उभाळे, वर्षा घोरपडे, सुनीता गोडसे यांच्यासह म्हाडाचे अधिकारी तसेच सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे पदाधिकारी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पत्रकार स्वतःची समस्या कधी सांगत नाहीत : जिल्हाधिकारी**

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी पत्रकार समाजातील प्रत्येक घटकाच्या समस्या मांडत असले तरी स्वतःच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात. सोलापुरात पदभार स्वीकारल्यानंतर पत्रकारांच्या आवासाचा विषय प्राधान्यक्रमात घेतला.

लवकरात लवकर, गुढीपाडव्याच्या अगोदरच तुमच्या नव्या घरात प्रवेश व्हावा आणि घरात दूध उकळण्याचा मंगल कार्यक्रम व्हावा, हीच माझी मनापासून इच्छा आहे. आमच्या तामिळनाडूमध्ये नव्या घरात प्रवेश करताना दूध उकळण्याची परंपरा आहे. आपल्या इथेही हा मंगल सोहळा लवकरच तुमच्या घरात व्हावा, असे ते म्हणाले.

**पत्रकारांचे ग्लॅमर कायम, अपवाद फक्त आर्थिक : आ. कल्याणशेट्टी**

पत्रकारांचे माझ्या राजकीय जीवनात मोठे योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा मी नेहमी आदर करतो. राजकारण्यांचे ग्लॅमर पाच-दहा वर्षांचे असते मात्र पत्रकारांचे ग्लॅमर कायम असते, अपवाद फक्त आर्थिक परिस्थितीचा! समाजासाठी धावणारे पत्रकार अनेकदा स्वतःच्या कुटुंबाकडे आणि घराच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्या कुटुंबालाही स्वतःचे घर असावे अशी अपेक्षा असते, असे आ. सचिन कल्याणशेट्टी म्हणाले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३

फोन/ फॅक्स(०२१७)२६०५०९१ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**

It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-0217-2605091 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No .MAHMAR 2006/17624**

# शिवरत्न शिक्षण संस्थेच्या नर्सिंग कॉलेजमध्ये पदवी प्रदान सोहळा संपन्न



अकलूज (कटूसत्य वृत्त):- शिवरत्न शिक्षण संस्था संचलित विजयसिंह मोहिते-पाटील स्कूल अँड कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूट, अकलूज येथील इ.डल. आणि च.डल. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान (Graduation Ceremony 2026) सोहळा शंकरनगर येथील उदय सभागृहात अत्यंत दिमाखदार वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक व प्रमुख पाहुण्या म्हणून कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेस (कराड) च्या अधिष्ठाता (Dean) डॉ. वैशाली मोहिते उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील व सचिव धर्मराज दगडे उपस्थित होते. तर इशितादेवी मोहिते-पाटील, डॉ. राजे भोसले, नितीन बनकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते पाटील यावेळी बोलताना म्हणाल्या 'आपल्या नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी विविध गावांमध्ये जाऊन उत्कृष्ट सामाजिक काम करत असतात. परंतु आजच्या सोशल मीडियाच्या युगात मुलांच्या कौशल्याचे आणि मेहनतीचे ग्रॅज्युएशन सोहळ्याच्या माध्यमातून कौतुक होणे गरजेचे होते. नवीन पिढीच्या विचारसरणीनुसार यावर्षीपासून आपण कॉलेजमध्ये प्रथमच पदवी प्रदान सोहळा सुरू केला आहे. आपल्या कॉलेजचे विद्यार्थी पुणे-मुंबईसारख्या शहरांत व देश विदेशात मोठ्या पदांवर प्रगती करत आहेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.'केवळ उपचार नव्हे, तर रुग्णांना आपुलकीची साथ द्या; स्तनाच्या कर्करोगाबाबत सतर्क राहा. तर डॉ. वैशाली मोहिते यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले, 'अकलूजमध्ये आल्यानंतर मला स्वतःच्या माहेरी आल्यासारखा आनंद झाला. वैद्यकीय क्षेत्रात केवळ 'क्युअर आणि केअर' (उपचार व काळजी) पुरेशी नसते, तर आपल्या गोड शब्दांनी रुग्णांचे मन जिंकणे आणि त्यांना मानसिक आधार देणे तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्याकडे अष्टलक्ष्मी असण्यापेक्षा 'आरोग्यलक्ष्मी' असणे सर्वात श्रेष्ठ आहे.'

पुढे बोलताना त्यांनी महिलांच्या आरोग्यावर विशेष भर दिला. त्या म्हणाल्या, 'सध्या महिलांमध्ये छातीचा (स्तनाचा) कर्करोग (Breast Cancer) ही एक अत्यंत गंभीर समस्या निर्माण होत चालली आहे. महिलांनी सुरुवातीच्या टप्प्यापासूनच याकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य उपचार घेतले, तर हा गंभीर आजार नक्कीच पूर्णपणे टाळता येतो.याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व संचालक मंडळ, एल.एम.सी. सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पदवीप्राप्त विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या सर्व टीमने विशेष परिश्रम घेतले. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सहकार महर्षि साखर कारखान्यास ऊस विकासाकरिता राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

अकलूज(कटूसत्य वृत्त):- सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.शंकरनगर या कारखान्यास नॅशनल फेडरेशन को ऑप. शुगर फॅक्टरीज लि. नवी दिल्ली या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेकडून गाळप हंगाम २०२५-२०२६ साठी ऊस विकासाकरिता उच्च उतारा विभागामध्ये तृतीय क्रमांकाचा सर्वोत्कृष्ठ सहकारी साखर कारखाना राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार जाहीर झाला आहे. सहकार महर्षि सहकारी साखर कारखान्यास यापूर्वीही विविध उल्लेखणीय कामे व प्राविण्याकरिता राष्ट्रीय व राज्य पातळीवरील अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

नॅशनल फेडरेशन को ऑप.शुगर फॅक्टरीज लि.नवी दिल्ली या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी सदर पुरस्काराची घोषणा केलेली आहे. मंगळवार दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथे सकाळी ११.३० वा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी व केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान व केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर पुरस्काराचे वितरण होणार आहे.



कारखान्याचे मार्गदर्शक संचालक,महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे व कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल प्रगती पथावर चालू आहे. स.म.शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२०२६ मध्ये ९६ दिवसात ७,६८,४७० मे. टन ऊसाचे गाळप करुन १०.९७ टक्के साखर उतारा मिळवून ७,२७,७७५ क्विंटल साखरेचे उत्पादन केले असून सरासरी ऊसाचे उत्पादन एकरी ४५ मे.टन इतके मिळाले. गळीत हंगाम २०२५-२०२६ मध्ये कारखान्याने प्रतिदिनी सरासरी ८००० मे.टन ऊसाचे गाळप केले. यासोबत डिस्टीलरी, को-जन व सेटीक सिड इत्यादी उपपदार्थ उत्पादने ही घेतलेली आहेत.कारखाना शेती ऊस विकास विभागाच्या माध्यमातून अनेक ऊस विकास योजना राबविल्या जात आहेत.

ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांना कारखान्याच्या माध्यमातून सोयी सवलतीचा लाभ ना-नफा, ना तोटा या तत्त्वावर देणेत येतो.

ऊस उत्पादक यांना जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेणेसाठी सेंद्रिय व जिवाणू खते वितरण तसेच वेळोवेळी मार्गदर्शनासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात असतात.

सदरचा पुरस्कार प्राप्त झालेबद्दल कारखाना सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व व्यवस्थापन या सर्वामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# कॉ. सीताराम येचुरी यांच्या स्मृतींना अभिवादन



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- थोर भारतीय मार्क्सवादी विचारवंत तथा माजी खासदार कॉ. सीताराम येचुरी यांच्या द्वितीय स्मृती दिनानिमित्त भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), सोलापूर जिल्हा समितीच्या वतीने दत्त नगर पक्ष कार्यालयात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. यावेळी कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी कॉ. सीताराम येचुरी यांच्या सोलापूरशी असलेल्या घनिष्ठ संबंधांसह कामगार चळवळ, शेतकरी-कष्टकरी जनतेचे प्रश्न आणि राजकीय प्रवासातील आठवणींना उजाळा दिला. येचुरी यांच्या विचारांचा प्रभाव आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्यावर राहिला असून, त्यांनी मांडलेली तत्त्वे केवळ भाषणांपुरती मर्यादित न ठेवता ती प्रत्यक्ष जनआंदोलनांत आणि संघर्षांत आचरणात आणली, असे आडम मास्तरांनी सांगितले. ार्क्सवाद हे सर्जनशील विज्ञान आहे; तो कोणताही ठरावीक सूत्र किंवा जडमतवाद नाही. बदलत्या परिस्थितीचे ठोस विश्लेषण करून शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी संघर्ष करणे, हाच मार्क्सवादाचा गाभा आहे, हा विचार यावेळी मांडण्यात आले. कॉ. येचुरी यांनी दिलेला हा वैचारिक दृष्टिकोन स्वीकारून कामगार, कष्टकरी, महिला, विद्यार्थी आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा उभारला. अन्यायाविरोधातील संघर्ष, धर्मनिरपेक्षतेचे रक्षण आणि लोकशाही मूल्यांची जपणूक हीच येचुरींना खरी आदरांजली असल्याचेही आडम मास्तरांनी स्पष्ट केले. भारतीय राजकारणात धर्मनिरपेक्ष लोकशाही, आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय यांना कॉ. येचुरी यांनी केंद्रस्थानी ठेवले.

देशातील विविधता, संविधानिक मूल्ये आणि लोकशाही संस्थांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या या भूमिकेचा आदर्श घेत आडम मास्तरांनी जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरणाला विरोध करत सर्वसामान्य जनतेच्या एकजुटीवर भर दिला. कामगारांच्या हक्कांसाठी, घरकुलासाठी, रोजगारासाठी आणि सामाजिक सुरक्षेसाठी उभारलेल्या चळवळींमध्ये येचुरींच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते, असे यावेळी नमूद करण्यात आले. कॉ. सीताराम येचुरी हे अभ्यासू, संयमी आणि प्रभावी वक्ते होते. देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सखोल विश्लेषण करून ते सामान्य जनतेच्या प्रश्नांशी जोडत असत. त्यांच्या विचारांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवी संवेदना आणि परिवर्तनाची दिशा होती. त्यामुळे त्यांच्या स्मृती जपण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा अभ्यास करून ते प्रत्यक्ष कृतीत उतरवणे होय, असे आडम मास्तरांनी सांगितले. यावेळी जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख मेजर यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. शैलेंद्र कांबळे, राज्य समिती सदस्य प्रा. बब्रुवाहन पोटभरे, नलिनीताई कलबुर्गी, दत्ता चव्हाण, ड. अनिल वासम, माजी नगरसेविका कामिनीताई आडम, सुनंदा बल्ला, व्यंकटेश कोंगारी आदींनी कॉ. येचुरी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# वित्तीय संस्थांच्या हितासाठी कठोर निर्णय घेणे आवश्यक – चेअरमन अनिलकुमार अनभुले

माढा(कटूसत्य वृत्त):- सध्याच्या स्पर्धात्मक युगात वित्तीय संस्था पारदर्शकपणे व सभासदांच्या विश्वासास पात्र राहून चालविणे आवश्यक आहे. कर्ज मागताना असलेली अनेक कर्जदारांची मानसिकता कर्ज भरताना राहत नाही त्यामुळे कार्यकारी मंडळ व कर्मचाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत राहून संस्थेच्या हितासाठी काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. वेळेवर कर्जवसुली झाली तरच वित्तीय संस्थांची प्रगती होते अन्यथा अनेक वित्तीय संस्था डबघाईस येतात तेंव्हा सर्वांनी ही संस्था माझी आहे या भावनेतून सहकार्य करावे असे आवाहन संस्थापक-चेअरमन अनिलकुमार अनभुले यांनी केले. ते विठ्ठलवाडी ता.माढा येथे श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

प्रास्ताविक आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांनी केले. पतसंस्थेचे सचिव सुशेन भांगे यांनी अहवाल वाचन केले. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील नवोदय विद्यालय व सैनिकी स्कूलसाठी निवड झालेले, गुणवत्ता शिष्यवृत्ती, मंथन,एटीएस आदी स्पर्धा परीक्षेतील १६ यशस्वी विद्यार्थ्यांना रोख बक्षीस वितरण करून सत्कार केला. रामकृष्ण जाधव यांना आरोग्य सेवक पदी पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचा पतसंस्थेचे वतीने चेअरमन अनिलकुमार अनभुले व सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड,बँक इन्स्पेक्टर नारायण खांडेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुढे अनिलकुमार अनभुले यांनी सांगितले की, सध्या पतसंस्थेकडे



११ कोटी २२ लाख रुपयांच्या ठेवी असून मागील आर्थिक वर्षात संस्थेला ९ लाखांहून अधिक नफा झाला आहे. भविष्यात एनपीएचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

कर्जदारांनी वेळेवर हप्ते भरुन सहकार्य करावे असे आवाहन करीत त्यांनी पात्र सभासदांना संस्थेच्या वतीने १० टक्के लाभांश देण्यात येणार असल्याचेही सांगितले. यावेळी सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड, नारायण खांडेकर,अशोक गव्हाणे,भिमराव शिंगाडे, मुख्याध्यापक सौदागर गव्हाणे,कांतीलाल मुळे, भिमराव गुंड,बालाजी गव्हाणे,रामदास कोकाटे, दत्तात्रय खैरे,अविनाश माने, भारत कदम,दिपक गव्हाणे, अंकुश डूचाळ,गणेश गुंड, समाधान कोकाटे,सतीश गुंड,धनाजी सस्ते,भिवाजी जाधव,रामकृष्ण जाधव, शिवाजी कोकाटे,कुबेर पालकर,शिवाजी जाधव, अशोक कदम,ज्ञानेश्वर शेंडगे, राहुल जाधव,दिनकर कदम,भिमराव नागटिळक, युवराज शेगर,मधूकर कदम, अंकुश नागटिळक,अशोक जाधव,आदिनाथ शेगर यांच्यासह ग्रामस्थ,सभासद व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांनी केले.आभार सचिव सुशेन भांगे यांनी मानले. फोटो ओळी- चेअरमन अनिलकुमार अनभुले.

# चारा छावण्यांऐवजी थेट अनुदान द्या; पै.माऊली हेगडे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चारा छावण्या सुरू करण्याऐवजी शेतकरी व पशुपालकांच्या बँक खात्यावर थेट चारा अनुदान जमा करावे, अशी मागणी मोहोळ तालुक्यातील हराळवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते पैलवान माऊली नागनाथ हेगडे यांनी मुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत अत्यल्प पाऊस झाल्याने शेती आणि पशुधनासमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

पिके करपण्यास सुरुवात झाली असून आगामी काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. यापूर्वीच्या दुष्काळात सुरू करण्यात आलेल्या चारा छावण्यांमध्ये जागेची कमतरता, जनावरे बांधण्याच्या जागेवरून वाद,कमी प्रमाणात चारा वाटप, बनावट नोंदी तसेच आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी वारंवार समोर आल्याचे त्यांनी नमूद केले.

त्यामुळे चारा छावणी किंवा चारा डेपो पद्धतीपेक्षा पशुगणनेचा आणि एकुण पशुधनाच्या संख्येनुसार थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) अधिक प्रभावी आणि पारदर्शक ठरेल,असे हेगडे त्यांनी म्हटले आहे.

शेतकरी व पशुपालकांच्या खात्यावर थेट अनुदान जमा केल्यास त्यांना त्यांच्या गरजेनुसार ओला व सुका चारा, कडबा,भुसा,पेंड वैरण तसेच इतर पशुखाद्य खरेदी करता येईल. तसेच शासनाचा व्यवस्थापनावरील खर्च कमी होऊन पारदर्शकता वाढेल. त्यामुळे ही योजना तातडीने राबवावी,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते माऊली हेगडे यांनी केली आहे.

# रजाक मुजावर यांचे निधन



मोहोळ (कटूसत्य वृत्त):- मोहोळ येथील मुजावर सायकल मार्टचे सर्वेसर्वा रज्जाक मुजावर यांचे सोलापूर येथील हॉस्पिटलमध्ये उपचार घेताना दुःखद निधन झाले.

शुक्रवार दिनांक ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी चार वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. पिंपरी चिंचवड पोलीस खात्यामध्ये मध्ये सेवा बजावत असलेले साकिब मुजावर यांचे वडील होते. शुक्रवार दिनांक ११ सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजता त्यांच्यावर मुस्लिम कब्रस्तान मध्ये त्यांचा दफन विधी करण्यात आला. त्यांच्या पाश्चात आई, पत्नी, तीन मुले असा परिवार आहे.

यावेळी शासकीय, सामाजिक, व्यावसायिक, शैक्षणिक सर्व स्तरातील मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. शांत आणि संयमी स्वभावाचे असलेले रजाक मुजावर यांच्या जाण्याने परिवारात शोककळा पसरली आहे.


**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फुट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधु के लिए सभी जातियों के प्रथ एवं द्वितीय वर-वधु के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौडव्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधु वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापुर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आव्हानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरुध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण ४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे ८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी १०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** १४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत) १९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे २५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी २७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव ३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया ३२) किमानच्या विरुध्दार्थी ३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलींचे एक नाव ४१) काकाची बायको ४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट ४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव- **** कामगार पक्ष ४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच ५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 160

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | | | | | 1 | | |
| | | | | | 2 | 3 | | |
| 1 | | | | 5 | | | | 4 |
| 9 | 8 | | 1 | | 5 | | 7 | 2 |
| 2 | 5 | 7 | 9 | | | | 3 | 1 |
| 6 | 1 | 3 | 7 | 2 | 8 | | 4 | |
| 4 | 2 | | 5 | | 1 | | | 3 |
| | 7 | 8 | | | 9 | | | 5 |
| | 6 | | 4 | | | | | |

# धोकादायक शाळांचे तातडीने उपाय योजनांचे निर्देश-चेतनसिंह केदार-सावंत



विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि दर्जेदार शिक्षण हीच आमची प्राथमिकता आहे. धोकादायक इमारतींबाबत तातडीने कार्यवाही करून आवश्यक त्या ठिकाणी नवीन बांधकामे सुरू केली जातील. तसेच जिल्हा परिषदेच्या स्वतंत्र शिष्यवृत्ती योजनेमुळे ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी भक्कम आधार मिळेल.
– चेतनसिंह केदार-सावंत, सभापती, शिक्षण समिती

माढा (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात दर्जेदार शिक्षण मिळावे, तसेच ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळावे, यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीच्या सभेत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सहकार महर्षी श्री. गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशाला, माढा येथे शिक्षण समितीची सभा सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत जिल्ह्यातील शाळांच्या पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांची सुरक्षा, शिक्षकांची उपस्थिती, शैक्षणिक गुणवत्ता, डिजिटल शिक्षण तसेच गुणवंत विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यातील ज्या शाळांच्या इमारती जुन्या अथवा धोकादायक झाल्या आहेत, त्यांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश सभापतींनी शिक्षण विभागाला दिले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागातील गरीब, होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळावी, यासाठी जिल्हा परिषद स्वतःची स्वतंत्र शिष्यवृत्ती योजना राबवणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा या सभेत करण्यात आली. या योजनेमुळे आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळणार आहे. शाळांमधील शिक्षकांची उपस्थिती, विद्यार्थ्यांची पटसंख्या आणि शिक्षणाचा दर्जा याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक शाळांना भेटी (Surprise Visits) द्याव्यात, अशा स्पष्ट सूचना सभापतींनी दिल्या. शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, याची नियमित तपासणी करण्यावर भर देण्यात आला. जिल्ह्यात ज्या ठिकाणी शाळांची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी नवीन शाळांच्या इमारती उभारण्याबरोबरच जुन्या शाळांच्या दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले. या कामांना गती मिळावी यासाठी आवश्यक ती कार्यवाही शिक्षण विभागाने थेट करावी, अशी भूमिका सभापतींनी मांडली. केवळ भौतिक सुविधा उपलब्ध करून न थांबता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत प्रत्यक्ष वाढ होण्यासाठी शिक्षक आणि केंद्रप्रमुखांनी विशेष प्रयत्न करावेत, असेही सभापतींनी सांगितले.

डिजिटल शिक्षण, नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धती यावर विशेष भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या. सभेला जिल्हा परिषद सदस्य सौ. वंदना कांबळे, कु. श्रुती भोरगुंडे, सौ. सोनाली बोधले, चंद्रकांत जाधव, विजयराज डोंगरे, शिवराज म्हेत्रे, नगराध्यक्षा मीनल साठे, शिवाजी कांबळे यांच्यासह शिक्षणाधिकारी मुळे, जगताप, शिंदे तसेच जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी (इएज) उपस्थित होते.

# पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांचा शिरापूर-मोरवंचीत आगळा वेगळा बैलपोळा साजरा



_शेतकऱ्यासाठी सरकारच नव्हे, तर कोणीच काही करत नाही. शेतकऱ्यांमध्ये जी दानत आहे, ती कोट्यवधींची उलाढाल असलेल्या उद्योजकांमध्ये दिसत नाही. शेतकरी हात राखून न ठेवता सर्वस्व देतो. आमचा स्वाभिमान असलेल्या पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांनी आमचा सन्मान करून आम्हाला प्रतिष्ठा मिळवून दिली.
– वामन आनंदा घरबुडे, बैलजोडी मालक, शिरापूर

सोलापूर कटूसत्य वृत्त):- गतवर्षी याच काळात सीना नदीला न भूतो न भविष्यतो असा महापूर आला होता.

२७ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान जिल्ह्यातील सहा तालुके पाण्यात बुडालेले होते. यंदा चित्र अगदी उलटे आहे. जूनपासून वरुणराजाने दडी मारल्याने खरीप हंगाम वाया जाण्याच्या मार्गावर आहे. बळीराजा दुष्काळाच्या सावटाखाली वावरत असतानाच, त्याला मायेची उब देणारा एक हृद्य सोहळा मोहोळ तालुक्यात पार पडला. ज्येष्ठ पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांनी शिरापूर आणि मोरवंची या दोन गावांतील बैलजोडी जपणाऱ्या शेतकऱ्यांसोबत बैलपोळा साजरा केला. ट्रॅक्टरच्या युगातही बैलाला कुटुंबाचा सदस्य मानून जपणाऱ्या या खऱ्या नांगरधाऱ्यांचा सन्मान व्हावा, या भावनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. गावच्या वेशीपासून ते गावचे ग्रामदैवत असलेल्या हनुमान मंदिरापर्यंत बैलजोडींची पारंपारिक ढोल-ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.

मंदिराच्या प्रांगणात मानाचा फेटा बांधून, शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि मायेची उब म्हणून खास सोलापुरी चादर भेट देऊन शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान ज्येष्ठ पत्रकार कृष्णकांत चव्हाण, सोलापूर दूरदर्शन केंद्राचे किशोर दुधगीकर आणि पत्रकार सौरभ वाघमारे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी शिरपूरचे माजी सरपंच सागर राजेपांढरे, शिक्षक विश्वनाथ सावंत, मोहन शेंडगे, गोटू आदमने, अमोल चव्हाण, ह.भ.प. अशोक काळे महाराज, रमजान तांबोळी, बाळासाहेब हारदाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बळीराजांचा झाला सन्मान शिरापूर गाव – विनोद शंकर मसलकर, आप्पा हरिदास कोळेकर, दत्तात्रेय भीवाजी शितोळे, शहाजी भीवा ढोबळे, संतोष नागनाथ मसलकर, जालिंदर नारायण बनसोडे, गोरख नारायण बनसोडे, बिरू मारुती कोळेकर, नागनाथ लिंबाजी रुपनर, वामन आनंदा घरबुडे, नवनाथ आनंदा घरबुडे, मधुकर यशवंत शिंदे, शिवाजी सोपान लोहार, नागनाथ दगडू कोळेकर, खेला नागनाथ पवार आणि संतोष किसन माळी.

मोरवंची गाव – राजाभाऊ अंबादास सरवळे, नाना गणी पठाण, सुभाष अंबादास इंगळे, मधुकर कडाप्पा पवार, अजिनाथ घोडीबा दळवे, दत्तात्रय माणिक कुंभार, सागर शंकर फाटे, भाग्यवान दगडू दळवे आणि नितीन उत्तम इंगळे. सत्कारानंतर शेतकऱ्यांच्या भावना ओथंबून आल्या होत्या.

आमच्यासाठी बैल म्हणजे केवळ जनावर नाही, तर कुटुंबातील सदस्य आहे. दुष्काळात चारा-पाणी महाग झाले तरी आम्ही त्यांना सांभाळतोय. आजवर आम्हाला कोणी विचारले नव्हते. ज्येष्ठ पत्रकार चव्हाण यांनी आमचा सत्कार करून आमच्या सर्जा राजासह आमचा मान वाढवला, अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# नेताजी प्रशालेस मुख्याध्यापक संघाचा 'जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार' प्रदान



सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयास सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्यावतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार' मुख्याध्यापक रविशंकर कुंभार व पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांना प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. इसबावी (पंढरपूर) येथील संतराज पॅलेस मध्ये आयोजित कार्यक्रमात शिक्षक आमदार जयंत आसगावकर, लेखाधिकारी श्रीकांत देवडीकर,मुख्याध्यापक संघाचे जिल्हा नियंत्रक समिती अध्यक्ष सुभाषराव माने ,स्वेरीचे अध्यक्ष बब्रुवान रोंगे, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने यांच्यासह सर्व जिल्हा पदाधिकारी आदी मान्यवरांच्या हस्ते शाळेला सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रशालेतील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

१९९० साली कामगार वसाहतीतील मुलांसाठी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी या शाळेची स्थापना केली होती. 'कामगार मुलांची शाळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विद्यालयातून आजपर्यंत हजारो विद्यार्थी घडले असून ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी व सर्व शिक्षक वर्ग सातत्याने प्रयत्नशील आहेत.

कला, क्रीडा, संगीत ,बाह्य परीक्षा,आर.एस.पी., स्काऊट-गाईड, आरोग्य व रक्तदान शिबीर, शिष्यवृत्ती वाटप अशा विविध शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमांचे आयोजन शाळेच्यावतीने करण्यात येते. सोलापूर शहरातून एकमेव नेताजी प्रशालेस हा पुरस्कार मिळाल्याने निलम नगर परिसरात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**शहरातील पुर्व भागातील पहिली डिजिटल शाळा**

प्रशालेने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमात मिळिवलेले वाखाणण्याजोगे यश तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदानी केलेल्या अविरत परिश्रम व सातत्यता ठेवून प्रशालेला नावारूपाला आणल्याबद्दल सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येत आहे असे जिल्हा अध्यक्ष तानाजी माने यांनी सांगितले.

# दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा-आ.सचिन कल्याणशेट्टी



अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. या पार्श्वभूमीवर अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी स्थिती,

पाणीटंचाई आणि शेतीसमोरील संकटाबाबत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्याशी सविस्तर चर्चा केली.यंदा अक्कलकोट तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक भागांत पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. विविध जलप्रकल्पांमध्येही अपेक्षित पाणीसाठा उपलब्ध नसल्याने शेती, पिण्याचे पाणी तसेच जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. त्यामुळे तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल तयार करावा, अशी मागणी आमदार कल्याणशेट्टी यांनी केली.

प्रत्यक्ष पाहणी व अहवालातील परिस्थिती लक्षात घेऊन अक्कलकोट विधानसभा मतदारसंघ दुष्काळग्रस्त घोषित करावा आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना तातडीने सुरू कराव्यात, याबाबतही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली.

पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन,

आवश्यक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था तसेच शेतकऱ्यांना आवश्यक मदत याबाबत प्रशासनाने वेळेत निर्णय घेणे गरजेचे आहे. परिस्थिती आणखी गंभीर होण्याची वाट न पाहता नागरिक, शेतकरी आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही आमदार कल्याणशेट्टी यांनी यावेळी केली.

कल्याणशेट्टी यांनी केलेल्या प्रमुख मागण्या : १)जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची तातडीने बैठक घेऊन अक्कलकोट तालुक्यातील सद्यस्थितीचा आढावा घेण्यात यावा व गंभीर दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव/अहवाल शासनास तातडीने सादर करण्यात यावा.

२. टंचाईग्रस्त गावांमध्ये तात्काळ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू करण्यासाठी आवश्यक नियोजन व निधी उपलब्ध करून देण्यात यावा. ३. जनावरांसाठी चारा छावण्या व चारा डेपो सुरू करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

४. बाधित शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई, आगाऊ मदत/अग्रिम रक्कम व इतर शासकीय मदत तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देण्यात यावेत.

५. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीज जोडणी खंडित न करण्याबाबत संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात यावेत.
६. उपलब्ध जलसाठ्याचे पिण्याच्या पाण्यासाठी प्राधान्याने नियोजन करून भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेता आवश्यक पर्यायी उपाययोजना तातडीने हाती घेण्यात याव्यात.याचबरोबर अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, पशुपालक व सर्वसामान्य नागरिकांची अत्यंत गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन,

शासनाने या विषयात तातडीने व संवेदनशीलतेने निर्णय घेऊन दुष्काळ जाहीर करण्याची कार्यवाही करावी व आवश्यक दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना त्वरित राबवाव्यात अशी आग्रही मागणी देखील केली आहे.

# अन्नछत्र मंडळाची स्वामी भक्तांसाठी चौफेर प्रगती-आ. संजयकुमार केणेकर



अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष-जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष- अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाने स्वामी भक्तांसाठी चौफेर प्रगती करीत असून, आम्हा छ.संभाजी नगरकरांचे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे तीर्थ स्थळ असल्याचे मनोगत आमदार संजयकुमार केणेकर (वि.प.स.) छ. संभाजी नगर-भाजपा यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे संस्थापक अध्यक्ष- जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांची सुबक, रेखीव, सुंदर अशी प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, पुरोहित संजय कुलकर्णी, दत्ता माने प्रवीण घाटगे, अतिश पवार, शहाजी यादव, एस.के.स्वामी, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# धोकादायक शाळा खोल्या, प्रलंबित बांधकामांवर तातडीने कार्यवाही-इंद्रजीत पवार



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीची मासिक सभा मा. इंद्रजीत पवार, उपाध्यक्ष तथा सभापती, बांधकाम व अर्थ समिती, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या उपस्थितीत पार पडली. या सभेत जिल्ह्यातील प्रलंबित शासकीय बांधकामे, धोकादायक शाळा खोल्या, जवाहरलाल नेहरू वसतिगृहातील मूलभूत सुविधा, ई-निविदा प्रक्रिया तसेच धोकादायक विहिरी आदी महत्त्वाच्या विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.मागील सभांमध्ये बांधकाम विभागाला देण्यात आलेल्या सूचनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत झाली, याचा मुद्देनिहाय अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश सभापती इंद्रजीत पवार यांनी प्रशासनाला दिले.

धोकादायक शाळा खोल्यांबाबत तातडीने कार्यवाही

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्ह्यातील धोकादायक शाळा खोल्यांची अद्ययावत माहिती शिक्षण विभागाला पाठविण्याबाबत मे २०२६ मध्ये आदेश देण्यात आले होते. या आदेशानुसार बांधकाम विभागाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली, याचा सविस्तर अहवाल सभेसमोर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच शाळांच्या स्लॅबचे काम सुरू असताना संबंधित शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कामाची पाहणी करणे, तसेच कामाच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी जीओटॅग छायाचित्रे देयकासोबत जोडण्याबाबत परिपत्रक काढण्यात आले आहे का, याचीही माहिती मागविण्यात आली. जवाहरलाल नेहरू वसतिगृहाचा स्ट्रक्चरल ऑडिट तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश:जवाहरलाल नेहरू वसतिगृहाच्या इमारतीची सुरक्षितता लक्षात घेऊन स्ट्रक्चरल ऑडिट तातडीने पूर्ण करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.वसतिगृहातील गाळेधारकांचे भाडेपट्टा करार, थकीत भाडे, पोटभाडे व अतिक्रमणाच्या प्रश्नावर यापूर्वी नोटिसा बजावण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या सूचनांवर आजपर्यंत नेमकी कोणती कार्यवाही करण्यात आली, याचा तपशीलवार अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. वसतिगृहातील मूलभूत सुविधांचा प्रत्यक्ष आढावा

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या निवास, पाणी, स्वच्छता, सुरक्षा तसेच इतर मूलभूत सुविधांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा व तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले.तसेच मागील पाच वर्षांत जवाहरलाल नेहरू वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय संख्या व संबंधित माहिती अद्ययावत स्वरूपात सभेसमोर सादर करण्यास सांगण्यात आले.
ई-निविदा प्रक्रिया व धोकादायक विहिरींचाही आढावा

जिल्ह्यातील विविध विकासकामांच्या ई-निविदा प्रक्रियेत पारदर्शकता व नियमानुसार कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे सभेत स्पष्ट करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील धोकादायक विहिरींच्या प्रश्नावरही प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

बांधकाम समितीच्या सभेत केवळ विकासकामांच्या मंजुरीपुरता विषय मर्यादित न ठेवता विद्यार्थी सुरक्षा, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, वसतिगृहातील सुविधा, निविदा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि धोकादायक संरचनांबाबत प्रशासनाची जबाबदारी निश्चित करण्यावर भर देण्यात आला.यावेळी बांधकाम समितीचे सदस्य नेताजी खंडागळे, अतुल पवार, पूजा ढेरे, सचिन जाधव, विकास बुळा आदी उपस्थित होते.

# लघुनाटिकेतून सायबर सुरक्षेचा संदेश; २१०० महिलांना सायबर सुरक्षेचे धडे



मोहोळ, (कटूसत्य वृत्त):- सायबर फसवणुकीच्या विविध प्रकारांबाबत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी लघुनाटिकेद्वारे जनजागृती करण्यात आले. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, त्याचप्रमाणे विविध उपाय याप्रसंगी सुचवण्यात आले. हा कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या स्कूल ऑफ कॉम्प्युटेशनल सायन्सेस आणि क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत नागनाथ कार्यालय, वडवळ येथे घेण्यात आले. हा उपक्रम श्री गणेश लोकसंचालित साधन केंद्र, मोहोळ यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास श्री गणेश लोकसंचालित साधन केंद्राच्या सुमारे २१०० महिला सदस्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती नोंदविली. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्कूल ऑफ कॉम्प्युटेशनल सायन्सेसचे डॉ. राजीवकुमार मेंते यांनी सायबर शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करून नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले. .कार्यक्रमास महिला आर्थिक विकास महामंडळ, सोलापूरचे जिल्हा समन्वयक मन्सूर पटेल, पंचायत समिती मोहोळच्या उपसभापती सौ. उल्का पाटील, जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मणदादा शिंदे, पंचायत समिती शिरापूरच्या सौ. नीलमताई मसाळकर तसेच शिरापूरच्या सरपंच सौ. वृषाली सावंत यांची उपस्थिती होती. या उपक्रमासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव डॉ. अतुल लकडे तसेच क्विक हील फाउंडेशनच्या अनुपमा काटकर, अजय शिर्के, गायत्री केसरकर आणि दीपु सिंह यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. ज्योती माशाळे, डॉ. अशोक शिंदे, डॉ. एस. डी. राऊत आणि डॉ. सी. जी. गार्डी यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रणाली मसाळ व प्रतीक माटोळे यांनी केले. कु अदिती पाटील हिने सर्वांना सायबर सुरक्षेची शपथ दिली, तर आभार अमित सावंत यांनी मानले. कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व सायबर वॉरियर्स उपस्थित होते. अनिकेत कांबळे, हर्षद दासरी ,श्रुती सलगर, मृत्युंजय कोळी व ओंकार बाबानगरे कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण केले.